आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र -दुपारी १.३० वाजता

२९ ऑक्टोबर २०२४ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- सरकारी नोकरी मिळालेल्या ५१ हजार पेक्षा जास्त युवकांना प्रधानमंत्र्यांच्या  हस्ते नियुक्तीपत्राचं वाटप

- आरोग्याशी संबंधित १२ हजार ८५० रुपये खर्चाच्या विविध विकास कामांचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन आणि भूमिपूजन

- महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी अर्ज भरण्याच्या आजच्या शेवटच्या दिवशी विविध राजकीय पक्षांच्या उमेदवारांची  अर्ज भरण्याची लगबग

**आणि**

- भारत आणि न्यूझीलंड महिला क्रिकेट संघांदरम्यान एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतल्या अंतिम सामन्याला अहमदाबादमधे प्रारंभ/ नाणेफेक जिंकून न्यूझीलंडचा प्रथम फलंदाजीचा निर्णय

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज दूरदृष्य प्रणालीद्वारे विविध सरकारी विभाग आणि संस्थांमध्ये नियुक्ती मिळालेल्या ५१ हजारांहून अधिक तरुणांना नियुक्ती पत्रांचं वितरण केलं. तरुणांना कायमस्वरुपी नोकऱ्या देण्यासाठी आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सरकारचे प्रयत्न सुरू असल्याचं त्यांनी यावेळी म्हटलं. हा रोजगार मेळावा देशभरात ४० ठिकाणी आयोजित केला जात आहे. केंद्र सरकारच्या विविध मंत्रालय आणि विभागांमध्ये नवनियुक्त कर्मचाऱ्यांना कर्मयोगी प्रारंभच्या माध्यमातून मूलभूत प्रशिक्षण घेण्याची संधी मिळणार आहे. नवनियुक्त

कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणासाठी कर्मयोगी पोर्टलवर ऑनलाइन मॉड्युल आणि एक हजार चारशेहून अधिक अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज धन्वंतरी दिन आणि नवव्या आयुर्वेद दिनानिमित्त नवी दिल्ली इथं आरोग्याशी संबंधित जवळपास १२ हजार ८५० कोटी रुपयांच्या योजनांचा प्रारंभ केला. यावेळी त्यांनी वय वर्षं ७० आणि त्याहून अधिक वयाच्या ज्येष्ठ नागरिकांना आयुष्मान प्रधानमंत्री भारत जन आरोग्य योजनेत सामावून घेण्याच्या योजनेचीही सुरुवात केली. यामुळे समाजाच्या सर्व वर्गातील ज्येष्ठ नागरिकांना आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध होतील. याशिवाय प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आरोग्य सेवा आणखी सुधारण्यासाठी विविध आरोग्य संस्थांचं उद्घाटन आणि पायाभरणीही झाली. या टप्प्यात एक पंचकर्म रुग्णालय, एक क्रीडा वैद्यक संस्था, एक केंद्रीय वाचनालय, एक आयटी आणि स्टार्टअप इन्क्यूबेशन सेंटर आणि ५०० खाटांच्या रुग्णालयाचा समावेश आहे. याव्यतिरिक्त विविध राज्यांमधल्या आरोग्याशी संबंधित इतर अनेक संस्था आणि उपक्रमांचाही त्यांनी दूरस्थ पद्धतीनं प्रारंभ केला. हा आपल्यासाठी हर्ष आणि गौरवाचा क्षण आहे. भारतीय आयुर्वेद संस्थान सातत्याने प्रगती करत असून हे केंद्र त्याचाच एक टप्पा आहे, असं केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यावेळी म्हणाले.

केंद्रीय रसायन आणि उर्वरक मंत्री जे. पी. नड्डा, केंद्रीय श्रम आणि रोजगार तसंच युवक कल्याण मंत्री मनसुख मांडवीय, तसंच केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री अनुप्रिया पटेल आणि खासदार शोभा करंदलाजे यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

देशांतर्गत सराफा बाजारात आज धनत्रयोदशीच्या दिवशी सोन्याच्या किमतीत प्रतितोळा ५०० रुपयांची घट झाली आहे. २४ कॅरेट सोन्याची किंमत आज ८० हजारांवरून घसरून ७९ हजार ७९० रुपये झाली आहे तर २२ कॅरेट सोन्याचा दर ७३ हजार १४० रुपये झाला आहे. चांदीच्या दरात मात्र कोणताही बदल झालेला नसून चांदीचा दर ९७ हजार ९०० रुपये प्रतिकिलो इतका आहे.

<><><><>

देशभरात आज दिवाळीचा दुसरा दिवस म्हणजेच धनत्रयोदशी साजरी होत आहे. आजच्या दिवशी धनाची आणि धानाची तसंच देवांचे वैद्य असलेल्या धन्वंतरींची पूजा आज केली जाते. धणे आणि गूळ यांचा नैवेद्य दाखवला जातो. या निमित्ताने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. भगवान धन्वंतरींच्या कृपेमुळे सर्वांना आयुष्य, आरोग्य, आनंद आणि समृद्धी लाभो, अशी शुभकामना करतो, असं प्रधानमंत्र्यांनी त्यांच्या समाज माध्यमावरच्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. आज साजऱ्या होणाऱ्या आयुर्वेद दिनानिमित्तही प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात शुभेच्छा दिल्या आहेत. निरोगी जीवनशैलीसाठी आयुर्वेद उपयुक्त ठरतो. भगवान धन्वतंरींची जयंती ही आयुर्वेदाच्या उपयुक्ततेशी आणि योगदानाशी निगडित असल्याचं प्रधानमंत्री आपल्या शुभेच्छा संदेशात म्हणाले आहेत.

<><><><>

दुसऱ्यांच्या बँक खात्यांचा वापर करून, अवैधरित्या पैशांचं हस्तांतरण करणाऱ्या प्रणालींविरुद्ध भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्राने सावधगिरी बाळगण्याचा इशारा दिला आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर संघटित सायबर गुन्हेगार, हवाला व्यवहार आणि तत्सम अवैध आर्थिक व्यवहारांसाठी अशा बँक खात्यांचा वापर करतात. गुजरात

आणि आंध्र प्रदेश पोलिसांनी अलीकडेच टाकलेल्या छाप्यांमध्ये असे गुन्हे उघडकीस आले असल्याचं गृह मंत्रालयाने म्हटलं आहे.

**<><><><><>**

भारत आणि स्पेन यांच्यात विविध क्षेत्रांमध्ये दीर्घकालीन आणि सशक्त भागीदारी आहे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितलं. मुंबई इथं भारत-स्पेन सीईओ फोरमला ते आज संबोधित करत होते, यावेळी स्पेनचे राष्ट्राध्यक्ष एच ई पेद्रो सँचेज उपस्थित होते. दळणवळण, पायाभूत सुविधा आणि उत्पादन या क्षेत्रांमध्ये दोन्ही देशांची भागीदारी शाश्वत आणि सर्वसमावेशक विकासाला चालना देईल, असं गडकरी म्हणाले. अशा आर्थिक संबंधांना बळकटी देण्यासाठी हा संवाद मदत करेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त नवी दिल्लीत आज एकता दौडीचं आयोजन करण्यात आलं होतं. दरवर्षी ३१ ऑक्टोबरला आयोजित केली जाणारी ही एकता दौड यावर्षी दिवाळीमुळे दोन दिवस आधीच म्हणजे आज घेण्यात आली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या एकता दौडीला हिरवा झेंडा दाखवला. एकता दौड ही देशाच्या एकतेसाठीच नाही, तर विकसित भारताचा संकल्प देखील असल्याचं शहा यावेळी म्हणाले. केंद्रीय मंत्री मनसुख मांडवीय यांच्यासह विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते. देशात इतरत्रही एकता दौडीचं तसंच सतर्कता सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी अर्ज भरण्याच्या आजच्या शेवटच्या दिवशी विविध राजकीय पक्षांचे उमेदवार आपापले अर्ज दाखल करत आहेत. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज शक्तिप्रदर्शन करत कामठी मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी साकोलीतून अर्ज भरला. शिवसेनेच्या मनीषा वाईकर यांनी जोगेश्वरी पूर्वमधून, संजय शिरसाट यांनी छत्रपती संभाजीनगर पश्चिममधून अर्ज दाखल केला. भाजपाच्या हेमंत रासने यांनी पुण्याच्या कसबा पेठ मतदारसंघातून, तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुनील टिंगरे यांनी वडगांव शेरीतून उमेदवारी अर्ज दाखल केला. इतरही उमेदवार आज अर्ज भरणार आहेत.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी विविध राजकीय पक्ष आपापल्या उमेदवारांच्या याद्या जाहीर करत आहेत. शिवसेनेनं काल १५ उमेदवारांची तिसरी यादी काल जाहीर केली. यात शायना एन. सी. यांना मुंबादेवीतून उमेदवारी देण्यात आली आहे. याशिवाय, शिवसेनेच्या दोन सहयोगी पक्षांचे उमेदवार आणि मतदारसंघांचाही समावेश या यादीत आहे. जनसुराज्य पक्षाचे अशोक माने हातकणंगले इथून, तर राजर्षी शाहूविकास आघाडीचे राजेंद्र येड्रावकर शिरोळमधून निवडणूक लढवणार

आहेत. काँग्रेसनं चार उमेदवारांची यादी काल जाहीर केली. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनंही काल १८ उमेदवारांची सातवी यादी प्रसिद्ध केली. राष्ट्रवादी काँग्रेसनं चौथ्या यादीत मोर्शीमधून देवेंद्र भुयार, तर भोरमधून शंकर मांडेकर यांना उमेदवारी जाहीर केली. दरम्यान, भारतीय जनता पक्षानं आज जाहीर केलेल्या यादीनुसार उमरेडमधून सुधीर पारवे, तर मीरा भाईंदरमधून नरेंद्र मेहता यांना उमेदवारी दिली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं भाजपच्या माजी नेत्या तृप्ती सावंत यांना वांद्रे पूर्व मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरवलं आहे.

**<><><><><>**

झारखंड विधानसभा निवडणुकांच्या दुसऱ्या टप्प्याचं मतदानही येत्या २०नोव्हेंबरला होत असून त्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आज संपणार आहे. दुसऱ्या टप्प्यात ३८जागांसाठी  आतापर्यंत ६३२ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. उद्या या अर्जांची छाननी होणार असून १ नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागे घेता येऊ शकतील. दरम्यान झारखंडमध्ये पहिल्या टप्प्यात होणाऱ्या निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी आता सुरू झाली आहे.

**<><><><><>**

भारत आणि न्यूझीलंडच्या महिला क्रिकेट संघांदरम्यान एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतला तिसरा आणि अंतिम सामना आज अहमदाबादमध्ये होणार आहे. दोन्ही संघांनी आधीचे एक एक सामने जिंकून बरोबरी साधली असल्यामुळे आजचा सामना जिंकून मालिका जिंकण्याचा दोन्ही संघ प्रयत्न करतील. न्यूझीलंड संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा करायचा निर्णय घेतला आहे.

**//<><><><><>//**